महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
प्रकाशगड, प्लॉट नं. जी-९, बांद्रा(पूर्व),
मुंबई-४०० ०५१
दिनांक: १२.८.९७

## परिपत्रक

विषय: कंत्राटी कामगारांच्या वेतनाबाबत.

---

म. रा. वि. मंडळातील कंत्राटी कामगारांचे वेतन कामगार आयुक्त, मुंबई यांच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकाप्रमाणे आजपर्यंत निर्धारीत केले जात होते. यापूर्वी अशाप्रकारे निर्धारित केलेल्या वेतन दरांची अंमलबजावणी दि. ३१.१२.९६ पर्यंत अमलात होती. त्यामुळे दि. १.१.९७ पासूनचे नवीन किमान वेतन दर तातडीने घोषित करण्याविषयी मुख्य कार्यालयाकडून कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडे पूर्वीपासून पाठपुरावा करण्यात आला होता. यानंतर कामगार आयुक्त, मुंबई यांच्याऐवजी महाराष्ट्र शासनाने त्यांचे शासकीय अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. किवेअ-६६९०/७०७०/कामगार-७ दि. ६.१२.९६ अन्वये हे वेतन दर निश्चित केलेले आहे त्याची प्रत सोबत जोडली आहे.

त्या अन्वये कारखाने अधिनियम, १९४८ (१९४८ चा त्रेसष्ट) यांचे कलम २, खंड (म) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे अथवा कलम ८५ च्या पोटकलम (२) च्या अर्थांतर्गत कोणत्याही कारखान्यातील रोजगारात परंतु महाराष्ट्र राज्यातील अनुसूची-मधील इतर कोणत्याही नोंदीमध्ये न मोडणाऱ्या रोजगारात कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी निश्चित केलेले वेतन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या जनित्र केंद्रातील कंत्राटी कामगारांना देय राहतील.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या जनित्र केंद्राच्या कारखान्याच्या बाहेर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना 'दुकाने आणि वाणिज्य' या अनुसुचित रोजगारांसाठी शासकीय अधिसूचनेनुसार यापूर्वीच निश्चित केलेले किमान वेतन देय राहतील.

वरील प्रमाणे खुलासा प्राप्त झाला असल्याने सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वरील अधिसूचना क्र. किवेअ-६६९०/७०७०/कामगार-७ दि. ६.१२.९६ अन्वये निर्देशित केलेल्या कंत्राटी कामगारांच्या किमान वेतन दरांची अंमलबजावणी निर्देशित दिनांकापासून म्हणजेच दि. ६ डिसेंबर १९९६ पासून करण्यात यावी असे सुचित करण्याविषयी सदस्य(प्रशासन) यांनी आदेशिले आहे.

त्या अनुसरुन संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वरील अधिसूचनेमध्ये निर्देशित केलेल्या कंत्राटी कामगारांच्या किमान वेतन दराची अंमलबजावणी त्वरीत करावी व त्याप्रमाणे आपला अहवाल मुख्य कार्यालयास सादर करावा.

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

२/-